३.००
२४.१.२०२२

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २४/०१/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सर्व व्यवस्थापनांचे, सर्व माध्यमांचे पुर्व प्राथमिक (नर्सरीते सिनीअर केजी) तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी चे वर्ग दि.२४/०१/२०२२ पासून सुरू करणेबाबत.

संदर्भ :-१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२१/प्रक्र२१३/एसडी-६ दिनांक २०/०१/२०२२

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०२१/प्रक्र१७८/एसडी-६ दिनांक २०/०१/२०२२

३. मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे पत्र जिकाठा/ जि.आ.नि.कक्ष/ शाळासुरू आदेश/२२, दि.२१/०१/२०२२

४. मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे पत्र जिकाठा/ जि.आ.नि. कक्ष/ नर्सरीते सिनीअर केजी/आदेश/२२ दि.२१/०१/२०२२

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील शाळांमधीलपुर्व प्राथमिक (नर्सरीते सिनीअर केजी) तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी च्या वर्ग असणाऱ्या सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळा दि. २४/०१/२०२२ पासून सुरू करण्याच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आले आहेत.

**संदर्भ क्र.३ व ४ अन्वये मा. जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे यांनी पारित केलेल्या दि.२१/०१/२०२२ च्या आदेशान्वये संपूर्ण ठाणे जिल्हाक्षेत्रातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थानांच्या पुर्व प्राथमिक (नर्सरीते सिनीअर केजी) तसेच इयत्ता १ लीते इयत्ता १२ वी चे वर्ग असणाऱ्या शाळा दि.२४/०१/२०२२ पासून सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. तरी सदरील आदेश उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जसेच्या तसे लागू करीत आहे.**

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी शासन व उल्हासनगर महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे/मार्गदर्शकसूचनांचे तंतोतंत पालन करणे सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या पुर्व प्राथमिक (नर्सरीते सिनीअर केजी) तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी च्या वर्ग असणाऱ्या शाळांना (निवासी शाळा व आश्रमशाळा वगळून) बंधनकारक राहील. मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारा व्यक्ती/संस्था/व्यवस्थापनाच्या आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंडसंहितेचे कलम १८८ अन्वये अपराध केला असे समजून कारवाईस पात्र राहील. सदर आदेश दिनांक २४/०१/२०२२ पासून उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सर्व शाळांना लागू राहतील.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

२४/१/२०२२

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका